सं.फौ.ख.क्र.१८४/२०२१
सरकार वि. लोकेश
नि.क्र.०९च्या खाली

साक्षीदार क्र **०३** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :– अंकिता चिंतामण कळसकर
वय २४ वर्ष, व्यवसाय– शेती
राह. गिरोला, तह.वरोरा, जि.चंद्रपुर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. दिनांक १८/१२/२०२० रोजीची घटना आहे. सदर दिवशी मी व माझी वहीणी पायीपायी आटो बसस्टॉपवर जात होतो. त्यावेळी आरोपी लोकेश मुळे याचा आटो दिसला त्यामध्ये मी व माझी वहीणी प्रभावती असे उमरेडला येण्यासाठी आटोमध्ये बसलो. त्यानंतर आम्ही उमरेडला आलो व सामान खरेदी झालयानंतर पुन्हा वापस चनोडा येथे जाण्यासाठी पुन्हा आरोपीच्या आटोमध्ये बसलो. त्यानंतर मी व माझी वहीणी प्रभावती तसेच प्रशांत मुळे व त्यांची पत्नी असे आरोपीच्या आटोमध्ये बसुन जात होतो त्यावेळी आरोपी हा त्याचे आटोरिक्षा वेगात चालवित होता. सदर आटो हिवरा हिवरी गावाजवळ आला असता आटो पलटी झाला व माझी वहीणी प्रभावती हिच्या डोक्याला सदर अपघातात मार लागला त्यामुळे तिच्या डोक्यामधुन रक्त वाहत होते व ती जागेवरच मयत झाली. जो व्यक्ती सदर आटो चालवित होता त्याला पाहिल्यास मी ओळखते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर नाही. (आरोपी गैरहजर असल्याने आरोपीच्या गैरहजेरीचा अर्ज दाखल, मंजुर, ओळखीबाबत तक्रार नाही. सदर अर्जाला **नि.क्र.१७** देण्यात आला.) पोलीसांनी माझे बयान घेतले होते.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड. एम.ए.भुरे यांचेमार्फत सुरू</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की आरोपी माझे गावातील रहीवासी आहे. तो आधीपासुन आटो चालवतो काय किंवा कसे त्याबाबत मला माहित नाही. माझे गावातील लोक आरोपीच्या आटोने येतात. आरोपीने आम्हांला उमरेड येथे त्याच्या आटोने सुरक्षित आणले होते. आरोपीच्या आटोने उमरेडवरून चनोडा येथे जात असतांना मी, माझी वहीणी, प्रशांत मुळे व त्याची पत्नी इत्यादी लोक बसलेले होते. उमरेड ते चनोडा या रस्तयावर स्ट्रीट लाईट नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर रस्त्यावर अंधारात प्राणी वगैरे फिरतात. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की आरोपी हा आटोमध्ये गाणे लावुन आटो वेगात चालवित होता. आरोपी

हा त्याच्या रिक्षामध्ये गाणे लावुन आटोरिक्षा वेगात चालवित होता हि बाब मी पोलीसांना सांगितली होती. आता मला माझे बयान दाखविले त्यामध्ये आरोपीने त्याच्या आटोमध्ये गाणे लावल्याबाबत मजकुर नाही उर्वरित मजकुर नमुद आहे. आरोपीला आम्ही गाडी जो–यात चालवु नको अपघात होवु शकतो असे आम्ही बोललो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की आरोपी हा त्याची रिक्षा बरोबर चालवित असतांना अचानक डुक्कर समोर आले त्यामुळे अपघात झाला. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की अचानक आटोच्यासमोर डुक्कर आले नव्हते कारण माझे लक्ष समोरच होते.

**३.** मी आटोमध्ये मधल्या सीटवर मध्ये बसलेली होती. आटो चालक हा पुढच्या सीटवर मध्यभागी बसलेला असतो. हे म्हणणे खरे नाही की मी मधल्या सीटवर मध्ये बसलेली असल्याने मला आटोच्या समोरील काहीच दिसत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की माझी वहीणी प्रभावती ही सदर अपघाताने मयत झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी हा त्याचे आटो भरधाव वेगात चालवत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला फसविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि. २४.०९.२०२५

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड